# • कोर्स प्रवेशासाठी नियम व अटी •

**१) प्रवेश पात्रता :** • अर्जदाराचे प्रवेश घेताना वय १८ वर्षे पूर्ण असावे.
• **शैक्षणिक पात्रता :** किमान शक्यतो एस.एस.सी. उत्तीर्ण असावे.

**२) प्रवेश अर्ज :** प्रवेश अर्ज स्वतः विद्यार्थ्याने व्यवस्थितपणे पूर्ण भरावा. अपूर्ण प्रवेश अर्ज भरल्यास विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. प्रवेश अर्जातील पत्ता, फोन नं. बदलल्यास संस्थेला त्वरीत कळवणे आवश्यक आहे.

- **प्रत्येक कोर्सची फी स्वतंत्र आहे.** एकदा भरलेली फी कोणत्याही कारणास्तव परत मिळत नाही किंवा दुसऱ्या कोर्सला (Transfer) वर्ग केली जात नाही.
- कुंडली, हस्तसामुद्रिक व अंकशास्त्राच्या पहिल्या वर्षाच्या सत्राला पाठ असतात व दुसऱ्या वर्षापासून पाठ नसतात. संपूर्ण फी सुरुवातीला भरल्यावरच सर्व पाठ (Study Material) पाठवले जातात.
- अभ्यासाची सवय रहावी म्हणून पाठात जे प्रश्न दिले आहेत त्यांची उत्तरे दिलेल्या अंतिम तारखेपर्यंत सुवाच्च अक्षरात स्वतःचे नाव, वर्ग व कोर्स पत्यासहित लिहून पाठवावीत **हे बंधनकारक आहे.** अन्यथा परिक्षेचा निकाल राखून ठेवण्यात येतो. **आपण पाठवलेली उत्तरे अभ्यासून तपासली जातात. चुकीचे असल्यासच कळविले जाते.** आपली इच्छा असल्यास स्वतःकडे प्रतिलिपी (Zerox) ठेवावी. अभ्यास परत दिला जात नाही.
- पाठाच्या संदर्भात काही शंका असल्यास त्याचे निराकरण केले जाते. मात्र त्यासाठी दूरध्वनीवर पूर्वनियोजित वेळ ठरविणे आवश्यक. वैयक्तिक प्रश्नांची उत्तर दिली जात नाहीत.
- प्रथम वर्षांच्या परिक्षांना अभ्यासक्रमाच्या मुदतीनंतर घरच्या घरी प्रथम व द्वितीय सत्रासाठी २०० मार्काची प्रश्नपत्रिका तथा उत्तरपत्रिका (Question Paper Cum Answer Sheet) पाठविली जाते. ती दिलेल्या मुदतीत मूळ स्वरूपात (Original) सोडवून पाठवावी लागते. प्रतिलिपी (Zerox) चालत नाही. आपणास हवे असल्यास आपण प्रत ठेवू शकता. मुदतीनंतर मिळालेल्या उत्तर पत्रिकांचा विचार केला जाणार नाही. परिक्षेस यावे लागत नाही.
- अंतिम परीक्षेतील प्रश्नाची उत्तरे सद्सद्विवेकबुद्धिवर स्मरणाने लिहावीत. तसे संस्थेच्या नियमाप्रमाणे विहीत नमुन्यामध्ये प्रतिज्ञापत्रक जोडावे लागते. **प्रतिज्ञापत्रक जोडणे बंधनकारक आहे.**
- परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. **तपासलेल्या उत्तरपत्रिका दाखवल्या जात नाहीत.**
- पहिल्या वर्षाच्या परिक्षेमध्ये पास झालेल्या विद्यार्थ्यांना **'फल ज्योतिष अभ्यास मंडळ'** संस्थेचे प्रमाणपत्र पोस्टाने दिले जाते. २ ऱ्या, ३ऱ्या व ४ थ्या वर्षाच्या संशोधन परिक्षामध्ये पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना **'फल ज्योतिष संशोधन ज्ञानपीठा'**तर्फे प्रमाणपत्र पोस्टाने किंवा समारंभपूर्वक दिले जाते.
- जे विद्यार्थी परिक्षेत अनुत्तीर्ण/गैरहजर असतील त्याना सामान्यतः दोन वेळा संस्थेच्या नियमाप्रमाणे फक्त परीक्षा फी भरून पुन्हा परिक्षेला बसण्याची संधी दिली जाते.
- पहिल्या वर्षाच्या परिक्षेसाठी मनिऑर्डर, एन.ई.एफ.टी. किंवा डी.डी. **'फल ज्योतिष अभ्यास मंडळ'** या नावाने पाठवावा. दुसऱ्या वर्षापासून परिक्षेस बसावयाचे असल्यास **'फल ज्योतिष संशोधन ज्ञानपीठ'** या नावाने पाठवावा. पाठवितांना स्वतःचे संपूर्ण नाव व पत्ता, कोर्सचे नाव सुवाच्च अक्षरात मनिऑर्डर फॉर्मवरील संदेशाचे जागेत, पत्राबरोबर किंवा एसएमएस मध्ये लिहावे.
- **कुंडली किंवा हस्तसामुद्रिक किंवा अंकज्योतिषातील दुसऱ्या वर्षाचा द्वितीय कोर्स करण्यासाठी प्रारंभिक कोर्स प्रथम उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.** किमान दोन वर्षाचा अभ्यासक्रम व स्वअनुभव ज्योतिष विषयक ज्ञानात मोलाची भर पाडू शकतो.
- **ज्योतिष विशारद, हस्तसामुद्रिक विशारद, अंकज्योतिष विशारद, ज्योतिष भास्कर, हस्तसामुद्रिक भास्कर, अंकज्योतिष भास्कर, अंकज्योतिष पंडित, ज्योतिष पंडित, ज्योतिर्विद्या वाचस्पती या संशोधन परीक्षा असून त्याचे अधिक माहितीसाठी स्वतंत्ररित्या पत्रव्यवहार करावा.** ह्यासाठी प्रथम व द्वितीय सत्र (Semester) त्या त्या शाखेच्या उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
- प्रश्नपत्रिका न मिळाल्यास संस्थेकडे रवाना होण्याच्या दिनांकापासून दहा दिवसाचे आत संपर्क साधावा.
- काही नियम व अटींवर संस्थेतर्फे महाराष्ट्रात विविध ठिकाणी व शाखांद्वारे (Franchise) प्रत्यक्ष ज्योतिष शिक्षणाची सोय केली आहे. याबाबत स्वतंत्र संपर्क करावा.
- **अभ्यासक्रमाच्या पाठाचे (Study Material) फोटो कॉपी (झेरॉक्स) करण्यास परवानगी नाही. तसे केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.** अभ्यासक्रम हरवल्यास संस्थेकडून सवलतीचे दराने उपलब्ध केले जातील.
- माहितीपत्रकातील कोणत्याही नियमाबाबत तसेच कोर्स फीबाबत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे त्याचप्रमाणे संस्थेत/ज्ञानपीठात प्रवेश देण्याचा अधिकार संस्थाध्यक्षांचे स्वाधीन.